मंगळवार, दि. ३ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १८२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

धावेडी येथे विकासकामांचा शुभारंभ

## गावाचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय - आ. खोतकर



**जालना । प्रतिनिधी -** आमदार अर्जुनरावजी खोतकर यांच्या विशेष प्रयत्नातून धावेडी गावात विविध विकासकामांचा भव्य उद्घाटन व लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. सकाळी नऊ वाजता आयोजित कार्यक्रमात ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

उद्घाटन व लोकार्पण करण्यात आलेल्या कामांमध्ये धावेडी ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम, हिंदू स्मशानभूमी बांधकाम उद्घाटन सोहळा, गावातील सिमेंट रोड बांधकामाचा उद्घाटन सोहळा, धावेडी गावातील सिमेंट रोड लोकार्पण सोहळा या कामांचा समावेश आहे.

या सर्व विकासकामांचा शुभारंभ मा. राज्यमंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना आमदार खोतकर यांनी सांगितले की, ''गावाचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय असून मूलभूत सुविधा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. ग्रामपंचायत कार्यालयामुळे प्रशासकीय कामकाज अधिक सुकर होईल, तर सिमेंट रस्त्यांमुळे नागरिकांना वर्षभर सोयीस्कर वाहतूक सुविधा उपलब्ध होईल.''

हिंदू स्मशानभूमीच्या बांधकामामुळे ग्रामस्थांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाल्याचेही त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, बबनराव खरात, भगवान अंभोरे, प्रभाकर गडलिंग, साहेबराव वाघ, सुधाकर वाडेकर, कडूबा पठाडे, संजय वाघ, कैलास सौंदणे, फकीरा पैलवान, बाबासाहेब जराड, बाबासाहेब जाधव, संतोष खरात, धनंजय बावणे, भास्कर वाडेकर, निवृत्ती साबळे, सर्जेराव शेवाळे, प्रभाकर विटेकर, शाहू खंदारे, पान २ वर





होळी सणानिमित्त मंमादेवी मंदिर येथे साडीचोळी नेसून मनोभावे पूजा करून होलीका दहन करत उत्सव साजरा करण्यात आला. पहिल्या छायाचित्रात तर दुसऱ्या छायाचित्रात जालना शहरातील राऊत नगर येथे सांस्कृतिक मंडळ तर्फे फ ुल व गुलालची उधळण करून कोरडी रंगाची होली उत्सव साजरा करतांना आमदार अर्जुनराव खोतकर, उपमहापौर राजेश राऊत, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी हत्ती रिसाला समितीचे अध्यक्ष अंकुश राऊत, सुभाष देविदान, पंडितराव भुतेकर, रवींद्र राऊत, रमेश गौरक्षक, हिरालाल पिपरीये, दिगंबर पेरे, सतीश जाधव, सतीश संचेती, सूर्यकांत पवार, शरद गादिया, प्रकाश जगताप, मुन्ना गजबी, सुभाष गायकवाड, गोविंद गाजरे, रामराज जाधव, ओमप्रकाश भिसे, बालाजी बांडे, रमेश कावळे, मच्छिंद्र शिंदे, मनोज जाधव, जीवन गिरी, रामदास मगर, पांडुरंग मैद, युवराज विजयसेनानी, भाग्येश जाधव, सुधाकर छडीदार, सचिन जयस्वाल आदी. (छाया - मजहर सौदागर / जावेद तांबोली)

युवा आदर्श

### होळी साजरी ...

**होळी रंगपंचमी सण
आबालवृद्धाउल्हास
धर्मासोबत शास्त्र ते
महत्वजाणावे खास
पुरे आता अट्टाहास
जल स्त्रोत विपर्यास
नैसर्गिक संसाधन ते
न मिळे विनासायास
रेनडान्स नवीन प्रथा
अति उत्साह हव्यास
इव्हेंट मॅनेजमेंट वृथा
जलसाठे सरे कशास
अति उत्साहे धूळवड
जलामृता करी -हास
वाचवायं पर्यावरणास
कधी सखोल अभ्यास
लुभावे इमारत खास
उध्वस्त करतो न्यास
थेंब थेंब वाचवी कसे
नको उगी उपन्यास
आबालवृद्धाससर्वांस
बचतीचा असो ध्यास
जिम्मेदारीसगळ्याची
झंझोट पोचवा मनास
कपोलकल्पित स्वप्ना
आवरा अति उल्हास
किंमत हर आसवांची
दाखवा क्रियोपन्यास**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

इराण-इस्त्राईल युद्धजन्य परिस्थितीचा फटका: खासदार डॉ. कल्याण काळे दुबईत अडकले

## सर्व सुरक्षित; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** पश्चिम आशियातील इराण आणि इस्त्राईल यांच्यातील वाढत्या लष्करी संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक विस्कळीत झाली आहे. या युद्धजन्य परिस्थितीमुळे दुबई येथील विमान सेवा ठप्प झाली असून, जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे हे आपल्या कुटुंबासह दुबईत अडकल्याची माहिती समोर आली आहे.

**विमान सेवा ठप्प झाल्याने प्रवासात अडथळा**

खासदार डॉ. कल्याण काळे हे नियोजित कौटुंबिक दौऱ्यानिमित्त दुबई येथे गेले होते. मात्र, इराणने केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर या भागातील हवाई क्षेत्र () सुरक्षेच्या कारणास्तव बंद करण्यात आले आहे. अनेक विमान कंपन्यांनी आपली उड्डाणे रद्द केल्यामुळे खासदार महोदय वेळेत भारतात परतू शकले नाहीत.

**डॉ. काळे सुखरूप; स्वीय सहाय्यकांचे स्पष्टीकरण**

या परिस्थितीमुळे जिल्ह्यातील कार्यकर्ते आणि हितचिंतकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर डॉ. कल्याण काळे यांचे स्वीय सहाय्यक प्रविण थाले यांनी अधिकृत प्रसिद्धी पत्रक ( ) काढून वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे.

''खासदार डॉ. कल्याण काळे साहेब परिवारासह दुबईत असून त्यांचा आमच्याशी नियमित संपर्क सुरू आहे. विमान सेवा विस्कळीत झाल्यामुळे त्यांच्या परतीच्या प्रवासात तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे. मात्र, साहेब आणि त्यांचे कुटुंबीय पूर्णपणे सुखरूप आणि सुरक्षित आहेत. त्यांच्या प्रकृतीबाबत काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही,'' असे थाले यांनी स्पष्ट केले आहे.

**अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन**

सोशल मीडिया आणि इतर माध्यमांतून पसरत असलेल्या उलट-सुलट चर्चांना पूर्णविराम देत, प्रविण थाले यांनी सर्व कार्यकर्ते, नागरिक आणि हितचिंतकांना विनंती केली आहे की, कोणीही कोणत्याही चुकीच्या अफवांवर विश्वास ठेवू नये.

**परिस्थिती पूर्वपदावर येण्याची प्रतीक्षा**

आंतरराष्ट्रीय स्तरावर युद्धजन्य परिस्थिती निवळल्यानंतर आणि विमान सेवा पुन्हा सुरू झाल्यानंतर खासदार डॉ. काळे भारतात परततील. सध्या ते दुबईत सुरक्षित स्थानी असून त्यांच्याशी संपर्क कायम असल्याचे प्रशासकीय गोटातून सांगण्यात येत आहे.

## खरात परिवाराची २२ वर्षांची होलिकोत्सव परंपरा मेव्हण्याने जपली!

अनिल घडलिंगे यांनी भक्तीचा नंदादीप विझू दिला नाही;

**जालना । प्रतिनिधी -** माणूस जातो, पण त्याने जपलेली परंपरा आणि संस्कार कसे जिवंत राहतात, याचे जिवंत उदाहरण जालन्यातील देहेडकरवाडी येथे पाहायला मिळाले. ज्या उत्साहाने आणि श्रद्धेने स्व. सुनील भागोजी खरात यांनी २२ वर्षांपूर्वी होलिकोत्सवाची ही ज्योत पेटवली होती, तीच ज्योत आजही तितक्याच प्रखरतेने तेवत आहे. पण, आज या उत्सवाकडे पाहताना एक प्रश्न मनात येतो कर्तव्य आणि नात्याची वीण इतकी घट्ट असू शकते का?

**आघातांची मालिका, पण परंपरेचा नंदादीप अखंड!**

गेल्या दोन दशकांपासून गणेशोत्सव, दुर्गामाता आणि दसरा महोत्सवाची परंपरा सुनील खरात यांनी जिवापाड जपली. त्यांच्या पश्चात त्यांचे धाकटे बंधू स्व. महेश खरात यांनी हा वारसा समर्थपणे खांद्यावर घेतला. मात्र, काळाचा महिमा अगाध आहे; तीन वर्षांपूर्वी महेश खरात यांचेही अकाली निधन झाले. दोन कर्त्या पुरुषांच्या जाण्याने खरात परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला. अशा परिस्थितीत ही परंपरा खंडित होणार का? असा प्रश्न अनेकांना पडला होता.

**मेव्हण्याने निभावले कर्तव्य!**

परंपरेचा हा वारसा पोरका होऊ नये म्हणून त्यांचे मेव्हणे अनिल घडलिंगे पुढे आले. रक्ताचे नाते नसले तरी, सासरच्या घराण्यातील श्रद्धेचा हा ठेवा त्यांनी आपल्या खांद्यावर घेतला. यावर्षी देखील परंपरेत कोणताही खंड पडू न देता, सौ. निकिता अनिल घडलिंगे यांच्या हस्ते विधिवत पूजन करून होळी दहन करण्यात आले. एका मेव्हण्याने दाखवलेली ही निष्ठा आणि प्रेम पाहून उपस्थित सर्वांचेच डोळे पाणावले.

या भावनिक प्रसंगी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक रमेश देहेडकर, सौ. रसना देहेडकर, प्रा. राजेंद्र बागुल, अमर शेळके, गणेश केदारे, स्वराज्य खरात, गोलू खरात, पप्पू शिंदे आणि देहेडकरवाडीतील रहिवाशांनी या परंपरेचे दर्शन घेतले.

जेव्हा एखादा माणूस निस्वार्थपणे दुसऱ्याच्या घराची परंपरा आपली मानून पुढे नेतो, तेव्हा ते केवळ मेव्हणे उरतात की भाऊ बनून आधार देतात? अनिल घडलिंगे यांनी या कृतीतून नात्याची एक नवी व्याख्या समाजासमोर मांडली आहे.



## जालन्यात होली महोत्सव व फाग गायनाचा जल्लोष

फुलांच्या होळीने पर्यावरणपूरक उत्सवाचा संदेश



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील ऐतिहासिक काद्राबाद भागातील संत गाडगे बाबा चौक येथे स्व. बडे पहेलवान (किशनलाल) काठोठीवाले आणि श्री कोर भजन मंडळ सांस्कृतिक साहित्यिक क्रीडा मंडळ यांच्या वतीने आयोजित होली महोत्सव व फाग गायन कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला. १ मार्च २०२६, रविवार रोजी रात्री ९ वाजता पार पडलेल्या या सोहळ्याने जालन्यातील सांस्कृतिक परंपरेची जोपासना केली.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान श्रीकृष्णाच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यावेळी माजी मंत्री तथा आमदार अर्जुनरावजी खोतकर, शिवसेना जिल्हासंपर्क प्रमुख भास्कररावजी अंबेकर, पंडित दादा भुतेकर, नगरसेवक रमेश गौरक्षक, दिनेश भगत, कमलेश खरे, रोहित भुरेवाल यांच्यासह अनेक प्रतिष्ठित नागरिकांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना आमदार खोतकर म्हणाले की, बडे पहेलवान यांनी संस्कृती जपली तर या पुढे फाग महोत्सव राज्यस्तरीय घेण्यात येईल, असेही खोतकरांनी सांगितले. तर स्व. चंदनवस्ताद जांगडे यांनी युग गितांच्या माध्यमातून जागृत करण्याचे काम केले व अंधश्रध्देकडून भक्तीकडे वळण्याचा मार्ग स्व. चंदन वस्ताद जांगडे यांनी लोकांना दाखवून जागृत केले, असे जिल्हा संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले.

**वीर रस आणि फाग गायनाने रंगली मैफल**

या महोत्सवात महाभारत, रामायण आणि वेदपुराणातील दोहे, गण आणि भक्तीगीतांचे सादरीकरण करण्यात पान २ वर

# संपादकीय पान

## वन्यजीव सरंक्षण गरजेचे

आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा केला जातो. वन्यजीवांची शिकार थांबवून वन्यजीव प्रजातींचे संवर्धन करणे हा या दिना मागिल मुख्य उद्देश आहे. १९७० च्या सुमाराला वन्यजीवांची शिकार, त्यांची तस्करी याचे प्रमाण वाढू लागले होते. हे प्रमाण इतके वाढले की त्यापैकी बरेचसे वन्यजीव कायमचे नष्ट होतात की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. याबाबत जागृती करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने ( युनो ) वन्यजीव दिवस साजरा करण्याचे ठरवले. यादिवशी वन्यजीवांचे रक्षण त्यांचे संवर्धन आणि निसर्ग साखळीतील त्यांचे महत्व आदी विषयांवर जनजागृतीचे कार्यक्रम केले जातात. नामशेष होण्याच्या धोका असलेल्या वन्य सृष्टीच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर बंधन आणणारा कायदा ३ मार्च १९७३ रोजी ८० देशांनी मान्य केला म्हणून या दिवसाला महत्व आहे. वन्यजीवांची शिकार तसेच त्यांच्या आणि दुर्मिळ वनस्पतींचा चोरटा व्यापार ही मोठी समस्या बनली आहे. केवळ भारतातच नाही तर जगभरात ही मोठी समस्या बनली आहे. एककिडे जंगले कमी होत आहे तर दुसरीकडे शिकार आणि तस्करीमुळे वन्यजीव नामशेष होत आहे. निसर्गाच्या समृद्ध परंपरेचा केंद्रबिंदू म्हणजे वन्यजीव. बंगालचे वाघ, आशियातील एकशिंगी गेंडे, भारतीय मोर आणि अशा इतर वैशिष्ट्यपूर्ण वन्यजीवांचे सुरक्षित वसतिस्थान म्हणजे जंगल. पण आता याच जंगलावर मानवाने अतिक्रमण केल्याने या वन्यजीवांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. हत्ती, गेंडा आणि वाघ हे जंगलातील मुख्य वन्यजीव आहेत. निसर्ग साखळीत या वन्यजीवांचे महत्व अनन्यसाधारण आहे पण हस्तिदंत, गेंड्याचे शिंग आणि वाघाच्या शरीरातील विविध अवयव यांच्या चोरट्या व्यापाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. जगभरात या व्यापारातून दरवर्षी ३५ हजार ते ७० हजार कोटी रुपयांची उलाढाल होत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. गेल्या ४० वर्षात जगभरातील अर्धे वन्यजीवन धोक्यात आले आहे. वन्यजीवांच्या तस्करीमुळे कायदा आणि सुरक्षा व्यवस्था, गुन्हेगारी टोळ्यांचा निधी यासारखे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहे. वन्यजीवांची शिकार तसेच त्यांच्या आणि दुर्मिळ वनस्पतींचा चोरटा व्यापार स्थानिकांच्या मदतीशिवाय होणे शक्य नाही. त्यामुळे असे होऊ नये यासाठी त्यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. निसर्गाच्या साखळीतील प्रत्येक घटक किड्यांपासून ते हत्तीपर्यंत पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी महत्वाचा आहे. ही बाब सर्वांनी ध्यानात घेतली पाहिजे. जगातील एकूण लोकसंख्येपैकी ३० टक्के लोकसंख्या तरुण आहे. सरकारनेही वन्यजीवांची शिकार करणारे व त्यांची तस्करी करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी. जंगलतोड होऊ नये यासाठी उपाय योजावेत. वन्यजीवांचे संरक्षण करणे ही आपली जबाबदारी नसून कर्तव्य आहे.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

## पान १ वरुन

### गावाचा सर्वांगिण ...

बाळासाहेब जाधव, सुरेश बोरुडे, महादेव वाघ, नंदू सहारे, संतोष सांगळे तसेच शिवसेना व युवा सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी धावेडी गावातील सर्व उपस्थित शेतकरी बांधवांनी आमदार अर्जुनरावजी खोतकर यांनी महाराष्ट्र राज्याच्या विधानमंडळात शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेल्या ठाम भूमिकेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

सीसीआयमार्फत सुरू असलेल्या कापूस खरेदी केंद्राच्या मुदतवाढीचा मुद्दा तसेच मका खरेदी केंद्राबाबत कृषी विभाग व पणन मंडळाच्या माध्यमातून तातडीने अधिक मका खरेदी केंद्र सुरू करण्याची त्यांनी केलेली मागणी ही शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी असल्याचे शेतकरी बांधवांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या आमदार अर्जुनरावजी खोतकर यांचे सर्व शेतकरी बांधवांनी मनःपूर्वक आभार मानले.

**गावाच्या विकासाचा नवा अध्याय**

धावेडी गावात एकाच दिवशी विविध विकासकामांचे उद्घाटन झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून गावाच्या विकासाचा नवा अध्याय सुरू झाल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

### जालन्यात होली ...

आले. प्रामुख्याने वीर रस फागाचे गायन करून उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे, गुलाल किंवा रासायनिक रंगांऐवजी फुलांचा वापर करून पर्यावरणपूरक होळी साजरी करण्यात आली.

''होली मे लाल नंदलाल दिखे, अति गुलाल शोभित भाल दिखे'' अशा शब्दांत नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांनी होळीच्या आध्यात्मिक महत्त्वाची मांडणी केली.

यावेळी जालन्यातील प्रसिद्ध भजन मंडळांनी आपली कला सादर केली. यात श्री कोर भजन मंडळ, अखिलेश भजन मंडळ, श्री गुल भजन मंडळ, श्री हर भजन मंडळ या सर्व मंडळांचा आणि कलाकारांचा सत्कार नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी कचरूलाल भगत, राधेश्याम भुरेवाल, किशनलाल मेघावाले, भावेश जागंडे यांसह अनेक ज्येष्ठ गायक व वादक उपस्थित होते.

कार्यक्रमाला अहिर नवयुवक संघाचे अध्यक्ष अक्षय गौरक्षक, सामूहिक विवाह समितीचे अध्यक्ष धन्नुलाल झाडीवाले, बबन भगत, कन्हैया वस्ताद, राधाकिशन जांगडे यांसह समाजातील विविध स्तरांतील मान्यवर, डॉक्टर, वकील आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन मुकेश जागंडे, सुनील भगत, सतपाल खाकीवाले, हरेश मेघावाले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांनी केले, तर उपस्थित सर्वांचे आभार नगरसेवक दिनेश भगत यांनी मानले. परंपरा आणि आधुनिकतेचा मेळ घालत संपन्न झालेल्या या कार्यक्रमामुळे संपूर्ण काद्राबाद परिसर भक्तीमय झाला होता.

# धुळवड लोकोत्सव हा सामाजिक एकतेचे प्रतिक

धुळवड लोकोत्सव हा सामाजिक एकतेचे प्रतिक

फाल्गुन हा शालिवाहन शके महिन्यातील शेवटचा महिना आहे. त्यामुळे होळी हा हिंदू दिनदर्शिकेनुसार येणा-या महिन्यातील शेवटचा सण असतो. होळी पेटवून दुस-या दिवशी म्हणजे धुलीवंदनाच्या दिवशी जमिनीला, मातीला नमस्कार करण्याची प्रथा आहे. प्रत्येक प्राणी मात्राचा देह हा पंचमहाभूतांपासून बनलेला असतो. पृथ्वी, आप, त्वज, वायू, आकाश असा या पंचमहाभूतांचा क्रम आहे. पृथ्वी पासून सुरुवात आणि आकाशापर्यंत शेवट असे पंचक असणा-या या तत्त्वांना आपल्या सणांच्या मधून आदर व्यक्त करण्याचा एक दिवस म्हणजे धूलिवंदन. यादिवशी पृथ्वीला वंदन केले जाते. त्यानंतर १५ दिवसांनी नववर्षाला म्हणजे पाडव्याच्या दिवशी आकाशाला भिडणारी गुढी उभारण्याची पद्धत आहे.

या दिवशी सकाळी घरातील बायका पाण्याची तपेली, घागरी, हंडे पाण्याने भरुन होळी पेटवलेल्या जागी ठेवतात. सूर्याच्या उन्हाने हे पाणी तापते. या पाण्याने लहान मुलांना आंघोळ घालतात. असे मानले जाते की या पाण्याने आंघोळ केली असता लहान मुलांना किंवा कोणालाही उन्हाळा बाधत नाही. या दिवसात कै-याही मिळू लागतात. कै-या उकडून त्याचा गर लहान मुलांना अंगाला लावून स्नान घालतात. मोठी माणसे होळीवर पाणी शिंपडून ती राख कपाळाला लावतात, अंगाला फासतात व नंतर स्नान करतात. काही ठिकाणी आजकाल लोकांनी आपापल्या सोयीनुसार होळीच्या दुस-या दिवशी रंगपंचमी साजरी करण्याची प्रथा सुरु केली आहे. त्यात लहान-मोठे, स्त्रिया-पुरुष सरसकट सगळे उत्साहाने रंग खेळतात. परंतु रंगपंचमी हा वेगळा सण आहे. वसंत ऋतूची चाहूल लागल्यामुळे या सुमारास झाडे नवीन पालवीने व विविध रंगी फुलांनी रंगीबेरंगी दिसत असतात. हवाही उष्ण झालेली असते. अशावेळी थंड पाणी अंगावर उडविणे सुखदायक असते. त्यामुळे रंगपंचमी हा सण सुरु झाला.

कुसुंबीच्या फुलांपासून काढलेल्या रंगाचे पाणी करून तसेच केशराचे पाणी करून ते एकमेकांच्या अंगावर उडविले जात असे. पेशवाईत तर हा सण शाही इतमामाने साजरा केला जात असे. रंगाच्या पिचका-या भरभरून हत्तीवरून गुलाल आणि इतर कोरडया रंगाची उधळण केली जात असे. आजकाल विविध प्रकारचे रंग पाण्यात कालवून ते एकमेकांवर उडवितात. विशेषतः तरुण स्त्री-पुरुषांना एकत्र येण्याची व थट्टा-मस्करी करण्याची संधी या सणामुळे मिळते. परंतु कालांतराने अश्लील शब्द उच्चारून शंखध्वनी करणे यासारख्या विकृत गोष्टीही या उत्सवात शिरल्या. आजकाल एखाद्या हौदातील पाण्यात रंग टाकून एकमेकांना त्यात डुबवून हसत खेळत या सणाची मजा लुटली जाते. धूलिवंदन (धुळवड) हा होळीच्या दुस-या दिवशी फाल्गुन वद्य प्रतिपदेला साजरा केला जाणारा रंगांचा आणि आनंदाचा सण आहे. या दिवशी होळीची राख आणि माती अंगाला लावून पृथ्वीला वंदन करण्याची पद्धत आहे. महाराष्ट्रात या दिवशी एकमेकांवर रंगपाणी आणि चिखल उडवून वसंत ऋतूचे स्वागत केले जाते. तसेच परस्परांतील मतभेद विसरून हा सण साजरा केला जातो. होळी पौर्णिमेच्या दुस-या दिवशी फाल्गुन वद्य प्रतिपदेस सकाळी धुळवड साजरी करतात. पहिल्या दिवशी पेटवलेल्या होळीच्या पवित्र राखेला वंदन करून ती अंगाला लावतात ज्याला धूलिवंदन म्हणतात. काही ठिकाणी विशेषतः ग्रामीण भागात चिखल उडवून धुळवड खेळली जाते. हा सण रंगप्रेम आणि वसंत ऋतूचे प्रतीक असून समाजातील बंध म्हणजेच सामाजिक एकता मजबूत करतो. पौराणिक संदर्भानुसार हिरण्यकश्यपूवर विष्णूच्या नरसिंह रुपाने मिळवलेल्या विजयाचे अर्थात वाईटावर चांगल्याचा विजयाचे हे स्मरण आहे. यामागिल वैज्ञानिक महत्त्व असा आहे की, हा सण रंगांचा वापर करून आरोग्यासाठी आणि वसंत ऋतूच्या बदलांमध्ये शरीरातील दोष संतुलित करण्यासाठीही साजरा केला जातो. एकंदरीत धूलिवंदन हे होळीच्या उत्सवाचा अविभाज्य भाग असून तो आनंदरंग आणि सामाजिक सलोख्याचा दिवस आहे.

रंग उधळले आसमंती
गोकुळ धुंद झाला
राधा-कृष्णाचा प्रेम स्नेह
चोहीकडे दरवळला

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

# राज्याची अर्थव्यवस्था सुदृढ याचे स्वागतच; मग विदर्भातील युवावर्ग रोजगार व शिक्षणासाठी पुण्या-मुंबईत किंवा देशाच्या इतर भागात का जातात?

राज्याची अर्थव्यवस्था देशात अव्वल आहे याचा अभिमान आम्हा सर्वांनाच आहे आणि असायलाच हवा.याचे जितके कौतुक कराल तितके कमी आहे,त्यामुळे याचे स्वागतच. राज्य सरकारने सन २०२९ पर्यंत एक लाख कोटी डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट सरकारने निर्धारित केले असून,राज्याची अर्थव्यवस्था आताच ५१ लाख कोटींवर पोहोचली आहे.अशी माहिती माननीय मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांनी दिनांक २६ फ ेब्रुवारी २०२६ ला विधानसभेत दिली.याचे मनापासून स्वागत. कारण राज्याच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा होणे म्हणजे देशाच्या विकासाला हातभार लावणे होय.परंतु देशाचा केंद्र बिंदू आणि राज्याची उपराजधानी नागपूर आहे ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.याच अनुषंगाने माझ्यामते राज्यातील व विदर्भातील युवावर्गानी रोजगारासाठी नागपूरमध्ये धाव घ्यायला पाहिजे होती, परंतु आज नागपूरसह विदर्भातील युवावर्ग रोजगारासाठी पुण्या-मुंबईत किंवा इतर राज्यात का धाव घेत आहे याचा गांभीर्याने सरकारने विचार करण्याची गरज आहे.आज नागपूरचा सुध्दा विकास झपाट्याने होत यात दुमत नाही. परंतु आयटी सेक्टर किंवा इतर फिल्डमधील युवकांना आपले घरदार सोडून दुसऱ्या शहरात धाव घ्यावी लागते ही नागपूर सारख्या उपराजधानीची शोकांतिकाच म्हणावी लागेल.उदाहरण द्यायचे झाले तर,आज इंजिनिअरिंग केलेल्या विद्यार्थ्यांना पुण्या-मुंबईत ५० हजारांच्यावरती पगार मिळतो आणि उपराजधानी सारख्या नागपूर शहरात १५ ते २० हजार रुपये पगार मिळतो अशी तफावत का? राज्य एकच आहे,शिक्षण एकच आहे, पदवी एकच आहे परंतु युवा वर्गाच्या भविष्यासोबत खिलवाड का? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.आज नागपूरातीलच नाही तर संपूर्ण विदर्भातील मोठ्या प्रमाणात युवावर्ग नौकरीच्या शोधासाठी पुण्या-मुंबईकडे धाव घेत आहे ही कल्पना सरकारला का नाही? यावरून स्पष्ट होते की,आज जो युवावर्ग इंजिनिअर झालेला आहे त्याच्या पसंतीचा जॉब किंवा नौकरी त्याला नागपूरात मिळत नसावी किंवा त्याच्या शिक्षणानुसार त्याला पगार मिळत नसावा म्हणूनच नागपूरसह विदर्भातील युवावर्ग राज्यातील पुणा-मुंबई किंवा इतर भागांची पसंत करत असावेत.आपली संस्कृती सांगते की, मुलांनी आई-वडीलांचा सांभाळ केला पाहिजे. अहो ज्याठिकाणी आई-वडील रहातात त्या ठिकाणी जर मुलांना योग्य आणि त्यांच्या शिक्षणानुसार नौकरीच ( जॉब ) मिळत नसेल तर त्याला नाईलाजास्तव जॉबसाठी आई-वडिलापासुन दुर जावे लागते आणि याला जबाबदार सरकार असल्याचे मी समजतो.अहो विदर्भातील मुलांना त्यांच्या मनालायक नौकरी मिळत नाही किंवा पगार नाही,मग सहाजीकच आहे त्यांना आई वडील आणि घरदार सोडून बाहेर जावेच लागेल.पहिलेच राज्यांमध्ये बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि आता त्यात भर घालण्याचे काम एआय करीत आहे यामुळे काही काळात आयटी सेक्टर सुद्धा धाराशाही होण्याची होण्याच्या मार्गावर असल्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.असेही सांगण्यात येते की, पुढील काही वर्षांत महाराष्ट्र जगातील १३ वी अर्थव्यवस्था होईल असे भाकीत माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्तविले आहे ही अत्यंत आनंदाची व गौरवास्पद बाब आहे.परंतु संपूर्ण महाराष्ट्र रोजगारीच्या बाबतीत सक्षम झाला आहे का, सर्वांना मुलभूत सुविधा उपलब्ध आहेत का?याचा विचार सरकारने करने गरजेचे आहे.आज आपण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सुदृढ आहे असे आपण सांगतो.परंतु राज्यातील विदर्भासह अनेक क्षेत्रातील युवा वर्ग शिक्षणासाठी व नौकरीसाठी आपले मुळ क्षेत्र सोडून राज्याच्या इतर भागात किंवा देशाच्या इतर भागात जातो याचे मुख्य कारण काय याचाही अभ्यास राज्याच्या अर्थतज्ज्ञांनी करण्याची गरज आहे.असे सांगितले जाते की परदेशातील थेट परकीय गुंतवणूकीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे,मग असे असुनही राज्यातील काही भागांतील युवावर्गांना समाधानकारक जॉब व पगार का मिळत नाही? देशातील एकूण गुंतवणूकीपेक्षा ३९ टक्के परदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात असल्याचे सांगितले जाते,मग राज्यातील संपूर्ण भागात भरघोस रोजगार निर्मिती का नाही? असे अनेक प्रश्न आजही राज्याच्या जनतेपुढे उपस्थित होतात.त्यामुळे सरकारने अर्थव्यवस्थेप्रमाणे रोजगार निर्मिती व वाढत्या महागाईनुसार रोजगारांना पगार दिले पाहिजे.सरकारने फक्त आश्वासने किंवा घोषणाबाजी करून चालणार नाही तर या संपूर्ण गोष्टी कृतीत बदलविल्या पाहिजे. त्याचप्रमाणे राज्याचा विकास भरभराटीला न्यायचा असेल तर सर्वप्रथम वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.कारण महागाई सर्वच गोष्टींमध्ये अडचण निर्माण करीत असते.राज्यातील १० टक्के सरकारी कर्मचाऱ्यांना वाढत्या महागाईनुसार डीए मिळत असतो याचे स्वागतच,परंतु त्याचा परिणाम ८० टक्के शेतकरी, शेतमजूर, गरीब, सर्वसामान्यांना भोगावा लागतो.त्यामुळे सरकारने सर्वप्रथम महागाईवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.आपण आपल्या अर्थव्यवस्थेनुसार राज्याचा विचार केला तर आपण सर्वच बाबतीत सक्षम असायला पाहिजे होते.परंतु आजही राज्याच्या अती दुर्गम भागात मुलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. यामुळेच आपल्याला अती दुर्गम भागात आजही कुपोषणाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. अशाप्रकारे आजही राज्यात अनेक मोठमोठ्या समस्या आहेत यावर सरकारने लक्ष केंद्रित केले पाहिजे.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# राजनंदिनी पवार बनल्या फ्यूचर वर्सिटी एज्युकेशन ग्रुप प्रस्तुत फेमिना मिस इंडिया महाराष्ट्र २०२६ च्या विजेत्या



**मुंबई -** फ्यूचर वर्सिटी एज्युकेशन ग्रुपतर्फे फ ेमिना मिस इंडिया महाराष्ट्र २०२६ स्टेट फिनालेचा भव्य सोहळा आयोजित करण्यात आला. हा संध्याकाळी सोहळा हाय-फॅशन कूट्योर ग्लॅमर, उत्कृष्ट स्टेज प्रेझेंटेशन आणि आधुनिक भारतीय एलिगन्स यांचा अप्रतिम संगम ठरला. मिस इंडिया ऑर्गनायझेशनच्या व्हिजन अंतर्गत फ्यूचर वर्सिटी एज्युकेशन ग्रुपने आयोजित केलेला हा प्रतिष्ठित कार्यक्रम मुंबईतील सुप्रसिद्ध बाल गंधर्व रंगमंदिर ऑडिटोरियममध्ये पार पडला, जिथे फॅशन, आत्मविश्वास, नवकल्पना आणि उद्देशपूर्ण आधुनिक महिला सक्षमीकरणाची झलक पाहायला मिळाली.

भारतीय उच्च शिक्षण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून फ्यूचर वर्सिटी एज्युकेशन ग्रुप () ला महाराष्ट्र, गुजरात आणि हरियाणा राज्यांमध्ये फ ेमिना मिस इंडिया आयोजित करण्याचा अधिकृत परवाना मिळाला आहे. संपूर्ण कार्यक्रमाचे व्यवस्थापन फ्यूचर वर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी केले, ज्यामुळे त्यांना भारतातील सर्वात प्रतिष्ठित प्लॅटफॉर्मपैकी एकावर प्रत्यक्ष इंडस्ट्री अनुभव मिळाला. स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग, प्रोडक्शन, क्रिएटिव डायरेक्शन, स्टायलिंग, बॅकस्टेज मॅनेजमेंट, मीडिया हँडलिंग आणि ऑन-ग्राउंड एक्झिक्युशनपर्यंत विद्यार्थ्यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. ही संकल्पना फ्यूचर वर्सिटीच्या इंडस्ट्री-इंटिग्रेटेड लर्निंग मॉडेलचे उत्तम उदाहरण आहे, जिथे शिक्षण वर्गखोल्यांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष मोठ्या प्रकल्पांशी जोडले जाते.

मुंबई मुख्यालयासह दिल्ली, अहमदाबाद, जयपूर आणि दुबई येथे कार्यरत असलेला फ्यूचर वर्सिटी एज्युकेशन ग्रुप नव्या पिढीच्या उच्च शिक्षण क्षेत्रात अग्रस्थानी आहे. मुंबई विद्यापीठ, संलग्न संस्था, केंद्रीय विद्यापीठे आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक भागीदारांच्या सहकार्याने फ्यूचर वर्सिटी इंडस्ट्री-ओरिएंटेड आणि जागतिक स्तरावर उपयुक्त असे अभ्यासक्रम उपलब्ध करून देते, जे शैक्षणिक उत्कृष्टता आणि व्यावसायिक तयारी यांचा समतोल साधतात. ++ मान्यताप्राप्त विद्यापीठ भागीदार आणि १५,००० हून अधिक यशस्वी माजी विद्यार्थ्यांसह, हा समूह एक्स्पिरिएन्शियल लर्निंग आणि इंडस्ट्री कनेक्टचे मजबूत उदाहरण बनला आहे. फ्यूचर वर्सिटीच्या विविध विभागांतील आणि विद्यार्थी मिस इंडिया ऑर्गनायझेशन आणि द टाइम्स ग्रुप यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करतात. ही भागीदारी संस्थेच्या दूरदृष्टीची आणि पेजंटच्या इनोव्हेशन, समावेशकता आणि युवा-प्रेरित उत्कृष्टतेच्या बांधिलकीची साक्ष देते. महाराष्ट्र पर्यटनाच्या व्हिजननुसार, फ्यूचर वर्सिटी फॅशनसोबतच राज्याची समृद्ध संस्कृती आणि परंपरा यांचा प्रसार करण्यासाठी सक्रियपणे काम करत आहे.

कार्यक्रमाची सुरुवात राज्य निवड प्रक्रियेच्या प्रभावी सादरीकरणाने झाली ज्यामध्ये मुंबई आणि पुणे येथे झालेल्या १० मोठ्या ऑडिशन्सचा समावेश होता. या ऑडिशन्समध्ये ७०० पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग घेतला आणि अखेरीस महाराष्ट्रातून टॉप १६ फायनलिस्टची निवड करण्यात आली, ज्या महत्त्वाकांक्षा, व्यक्तिमत्त्व आणि नव्या पिढीच्या नेतृत्वाचे प्रतीक आहेत.

स्टेजवर फायनलिस्ट इंट्रोडक्शन राउंडमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. त्यानंतर तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण रॅम्प वॉक राउंड, प्रभावी इंट्रोडक्शन राउंड आणि इंटरॅक्टिव राउंड पार पडले, ज्यामध्ये सौंदर्य, बुद्धिमत्ता, आत्मविश्वास आणि स्टेज प्रेझेन्सचे उत्कृष्ट प्रदर्शन झाले. स्पर्धकांच्या खास वैशिष्ट्यांचा सन्मान करत सब-कॅटेगरी टायटल्स जाहीर करण्यात आले:

मिस ब्यूटीफुल स्माईल - पारिनाज कूपर, मिस ग्लोइंग स्किन - समायरा शाह, मिस रॅम्पवॉक - आर्या खैरनार, मिस फोटोजेनिक - तमन्ना भारत, मिस कॉन्जेनियलिटी - पारिनाज कूपर.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर अभियानातंर्गत बैठक

# अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समन्वयाने कामे करावीत - जिल्हाधिकारी

## जिल्ह्यात ७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यात दि.७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर आयोजित करण्यात आले आहेत. ही शिबिरे हे प्रत्येक तालुक्यातील महसूल मंडळ, नगर परिषद व नगर पंचायतीस्तरावर घेतली जाणार आहेत. तरी महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख आणि गतिमान करण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समन्वयाने कामे करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर अभियान टप्पा-१ अंतर्गत व्हिडीओ कॉन्फर्सिंगद्वारे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीस अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, सहायक जिल्हाधिकारी बी.सर्वनन यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान (टप्पा-१) अंतर्गत समाधान शिबिरांच्या पूर्वतयारीचा आढावा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी नुकताच घेतला आहे. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित कामे आणि नागरिकांच्या तक्रारी एकाच ठिकाणी निकाली काढणे हे आहे. तरी अधिकाधिक नागरिकांना शिबिराचा लाभ घेता यावा यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीराची



जनजागृती सर्व माध्यामाद्वारे करण्यात यावी. तसेच छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीराचे सुक्ष्म नियोजन करावे, अशा सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

समाधान शिबिरात भोगवटदार वर्ग-२ ते वर्ग-१ परावर्तन पुर्ण करुन सातबारा अद्ययावत देणे, जीवंत सातबारा अंतर्गत प्रलंबित नोंदी दुरुस्त करणे, सामाजिक योजनांचे अर्ज मंजूर करुन शिबिरात वितरण करणे, पाणंद रस्ते व सर्वांसाठी घरे प्रकरणे निकाली काढुन आदेश/पट्टे वाटप करणे, प्रलंबित व विवादग्रस्त फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क सुरु करणे, अकृषिक सुधारणाकरणेबाबत मार्गदर्शन करणे, लोकसेवा हक्क कायद्यानुसार प्रमाणपत्र अर्ज स्विकारणे व वितरण करणे, डिजीटल सातबारा, व नवीन महसूल तरतुदींची जनजागृती करणे, कमी जास्त पत्रके अद्ययावत करणे, एक खिडकी सुविधेद्वारे ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक, पीएम किसान व तक्रार निवारण सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. अशी माहिती ही यावेळी देण्यात आली. या बैठकीस सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार व्हिडीओ कॉन्फर्सिंगद्वारे उपस्थित होते.

# समाज कल्याण विभागाच्या गटई स्टॉल योजनेच्या निकषात सुधारणा

**जालना । प्रतिनिधी** - अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील बांधवांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी राज्य शासनाने गटई स्टॉल योजनेच्या व्याप्तीमध्ये मोठे बदल केले असून निकषांमध्ये सुधारणा केली आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने २८ जानेवारी २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार आता ही योजना अधिक व्यापक आणि सुटसुटीत करण्यात आली आहे. पूर्वी ही योजना संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत राबविली जात होती. मात्र नव्या निर्णयानुसार आता या योजनेची संपूर्ण अंमलबजावणी आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत केली जाणार आहे.

चर्मकार, ढोर, होलार, मोची व इतर पोटजातींमधील गरजू कामगारांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामीण भागासाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा ४० हजार रुपयांवरून ८० हजार रुपये करण्यात आली आहे. तर शहरी भागासाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा ५० हजार रुपयांवरून १ लाख रुपये करण्यात आली आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया एप्रिल २०२६ नंतर सुरू होणार आहे. याबाबतची अधिकृत जाहिरात आणि प्रसिद्धी समाजकल्याण विभागामार्फत लवकरच देण्यात येईल. महानगरपालिका, नगरपालिका, छावणी क्षेत्र आणि ग्रामपंचायत क्षेत्रातील पात्र उमेदवारांना १०० टक्के शासकीय अनुदानावर हे स्टॉल दिले जाणार आहेत. असे सहायक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक संपन्न

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची महत्त्वपूर्ण बैठक शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात पार पडली. सकाळी ११ वाजता आयोजित केलेल्या या बैठकीत ग्राहकांच्या विविध तक्रारी आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर आणि अशासकीय सदस्य सतिश पंच यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी जिल्ह्यातील बाजारपेठांमधील वाढती भेसळ, वजन-मापांमधील तफावत आणि सेवांमधील त्रुटींबाबत सदस्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. अशासकीय सदस्यांनी केलेल्या सुचनांवर अंमलबजावणी करावी तसेच ग्राहकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश अपर जिल्हाधिकारी मिसाळ यांनी यावेळी दिले. बैठकीला समितीचे इतर शासकीय व अशासकीय सदस्य उपस्थित होते.

# तहसीलदार रंगनाथ मेंडके यांचा सेवानिवृत्तीनिमित्त जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते गौरव





**जालना । प्रतिनिधी** - जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल शाखेत कार्यरत असलेले तहसीलदार रंगनाथ मेंडके हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार आज सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात एका विशेष निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी तहसीलदार श्री.मेंडके यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तहसीलदार रंगनाथ मेंडके यांनी आपल्या कार्यकाळात महसूल विभागात अत्यंत सचोटीने आणि कार्यक्षमतेने काम केले. प्रशासनातील विविध जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांनी सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्य दिले, अशा शब्दात त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, सहायक जिल्हाधिकारी बी. सर्वनन यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुदर्शन सोळंके यांची शिवसेना परतुर तालुका पदी पुनर्नियुक्ती

## शिवसेना नेते ना संजय राठोड यांनी दिले नियुक्ती पत्र

**परतुर । प्रतिनिधी** - शिवसेना चळवळीतील जुने कार्यकर्ते व तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके यांची पुन्हा एकदा परत तालुका शिवसेना प्रमुख पदी निवड करण्यात आली याबाबत शिवसेना नेते जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते नियुक्तीपत्रक देऊन सदर निवड घोषित करण्यात आली यावेळी शिवसेना आमदार हिकमत उढाण जिल्हा जालना प्रमुख ए जे बोराडे व प्रल्हाद बोराडे किसन तात्या मोरे अमोल सुरुंग कोयरे सर पप्पू भय्या दयमां रामजी खवल यांच्यासह वरिष्ठ नेत्यांची मुख्य उपस्थिती होती.

दिलेल्या नियुक्तीपत्रकात वरिष्ठांच्या वतीने असे सांगितले की तळागाळापर्यंत शिवसेनेची विचारधारा पोहोचवत स्वर्गवासी बाळासाहेब ठाकरे व स्वर्गवासी आनंद दिघे यांच्या विचार सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे काम या या पदाच्या माध्यमातून करावा व शिवसेनेची मोठी फळी निर्माण करत गाव तेथे शिवसैनिक निर्माण करत शिवसेना चळवळ बळकट करावी अशा पत्रकाच्या माध्यमातून संजय मोरे यांनी सुदर्शन सोळंके यांना शुभेच्छा व्यक्त केल्या आहे.



याबाबत आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना सुदर्शन सोळंके यांनी सदरील पद गेल्या अनेक वर्षापासून मी सांभाळत असून परतुर मतदारसंघात शिवसेनेच्या व नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या विचारांचा शिवसैनिक घडवण्यासाठी मी अहोरात्र प्रयत्न करत आलो असून शिवसेनेची मोठी फळी या कार्यक्षेत्रात वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली मी निर्माण केले आहे माझ्या या कार्याची दखल म्हणून पुन्हा एकदा सदरील पदाची जबाबदारी आपल्यावर आली असून निश्चित या पदाच्या माध्यमातून वरिष्ठ नेत्यांना अपेक्षित असलेली शिवसेना चळवळ व शिवसेनेचा झंजावात या तालुक्यात निर्माण करेल अशी ग्वाही नवनिर्वाचित तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके यांनी दिली या कामात सर्व वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्यांना व शिवसैनिकांना सोबत घेऊन आपण कार्य करणार असल्याचे अभिवचन त्यांनी यावेळी दिले. या निवडी बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होताना दिसत आहे.








जालना शहरातील मामा चौक येथे मानाचे होळीचे पूजन व दहन पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती पोलीस उपनिरीक्षक शैलेश म्हस्के, अमरचंद भगत दीपक भुरेवाल, रमेश यज्ञेकर, अच्युतराव कदम आदी
(छाया । जावेद तांबोली )

# जालना मनपाच्या विकासकामांना वेग; प्रभाग ९ मध्ये ६६ लाखांच्या कामांचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा

## नगरसेविका सौ. संध्या संजय देठे यांच्या विशेष प्रयत्नातून एलईडी लाईट, रस्ते, नाली व पाणीपुरवठा कामांना गती

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या निधीतून प्रभाग क्रमांक ९ मध्ये तब्बल ६६ लाख रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. नगरसेविका सौ. संध्या संजय देठे यांच्या विशेष प्रयत्नातून ही कामे मंजूर झाली असून परिसराच्या विकासाला नवे बळ मिळाले आहे.

दि. १ मार्च २०२६, रविवार रोजी सकाळी १० वाजता स्वामी विवेकानंद चौक, रेल्वे स्टेशन मशीद परिसर, जालना येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, नगरसेवक महावीर ढक्का, नगरसेवक अक्षय गोरंट्याल, नगरसेविका सौ. संध्या संजय देठे, नगरसेविका सौ. मंगल गरदास, नगरसेवक विक्रांत ढक्का यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रभाग क्र. ९ मधील काळूका मंदिर रोड ते रेल्वे स्टेशन रोड दरम्यान २० लाख रुपये खर्चून ४० विद्युत पोलसह ८० एलईडी लाईट बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून त्याचे



लोकार्पण करण्यात आले. एलईडी लाईटमुळे परिसर उजळून निघणार असून नागरिकांच्या सुरक्षिततेत भर पडणार आहे. तसेच रेल्वे स्टेशन मशीद परिसरात १० लाख रुपये खर्चाच्या ट्रिमिक्स रस्ते व अंडरग्राउंड नाली बांधकामाचा शुभारंभ करण्यात आला. सोनल नगर परिसरात १० लाख रुपये खर्चाच्या नवीन पिण्याच्या पाईपलाईन कामाचा शुभारंभ झाला. मधुबन कॉलनी येथे ३ लाख रुपये खर्चून अंडरग्राउंड नाली बांधकाम सुरू करण्यात आले. हरिओम नगर (वानखेडे ते चिंचवडेकर यांच्या घरापर्यंत) ३ लाख रुपये खर्चाच्या अंडरग्राउंड नाली बांधकामाचा शुभारंभही करण्यात आला.

या कामांमुळे प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा आणि स्वच्छता व्यवस्थेत लक्षणीय सुधारणा होणार असून पावसाळ्यातील पाणी साचण्याच्या समस्येवर मोठ्या प्रमाणात तोडगा निघणार आहे. यावेळी नगरसेवक अक्षय गोरंट्याल म्हणाले, ‘‘आदर्श जालना आदर्श प्रभाग बनवण्याचा आमचा संकल्प असून प्रभाग क्र. ९ मधून या संकल्पनेची सुरुवात केली आहे.’’ माध्यमांशी बोलताना नगरसेविका सौ. संध्या संजय देठे यांनी सांगितले, ‘‘प्रभागातील मूलभूत सुविधांचा प्रश्न मार्गी लावणे हे आमचे प्राधान्य आहे. नागरिकांच्या सहकार्याने आणखी विकासकामे राबविण्यात येतील.’’ या विकासकामांमुळे प्रभाग ९ मध्ये विकासाची नवी पहाट उगवणार असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# परतुर शहरात पोलीस ठाणे परतुर येथील अधिकारी अंमलदार यांचे पथसंचलन

**परतूर । प्रतिनिधी -** शहरातील पोलीस ठाणे परतुर यांनी होळी, धूलिवंदन व रमाजन ईद सणांच्या अनुषंगाने दि.०२/०३/२०२६, रोजी पथसंचलन आयोजित करण्यात आलेले होते. सदर पथसंचलन हे आष्टी गेट येथुन सुरु होऊन महादेव मंदिर चौक- शिवाजीनगर चौक- तहसिल कार्यालय चौक- पोलीस ठाणे चौक- मलंगशहा चौक- चौक मजिस्द- देशपांडे गल्ली- कुंभार गल्ली- खंडोबा मंदिर जुना पोस्ट ऑफीस रोड व गणपती विसर्जन च्या मार्गाने काढण्यात आलेली असुन पोलीस ठाणे परतुर येथे पथसंचलनाचे विसर्जन करण्यात आलेले आहे.

सदर पथसंचालनास पोलीस निरीक्षक,सुदाम भागवत. पोलीस ठाणे परतुर, वैद्य, सपोनि, पल्लेवाड, रावते, मुंढे, पोउपनि, पोलीस ठाणे परतुर येथील अंमलदार, प्लॉटून, गृहरक्षक दलाचे होमगार्ड असे एकुण अधिकारी ०५, अंमलदार ३८,होमगार्ड २६, यांचा समावेश होता



# बी. पी. उगले इंग्लिश स्कूलमध्ये २६ वा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा संपन्न




**जालना । प्रतिनिधी -** येथील बी. पी. उगले इंग्लिश स्कूलचा २६ वा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि आनंदात पार पडला. शालेय जीवनातील आठवणी आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या या कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे उद्घाटन आणि प्रमुख पाहुणे या शानदार सोहळ्याचे उद्घाटन जालना नगरपालिकेच्या नगरसेविका श्रीमती सुशीलाताई दानवे आणि श्रीमती पडूळ मॅडम यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून भारतीय जनता पार्टीचे जालना जिल्हाध्यक्ष श्री. भास्करराव दानवे उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

या सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यामध्ये प्रामुख्याने: संजय सोनवणे (गुन्हे शाखा, जालना), रवींद्र ढगे (सरपंच, सिरासवाडी), मुरलीधर मस्के (कृषी अधिकारी, भोकरदन), श्रीमती संगीताताई मस्के (शाळा विश्वस्त), श्रीमती सुरेखा कुंफाळे (सचिव) या मान्यवरांचा गौरव शालेय व्यवस्थापनाच्या वतीने करण्यात आला.

या संपूर्ण कार्यक्रमाचे अध्यक्षपद शाळेचे अध्यक्ष प्रा. बाबा उगले यांनी भूषवले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी शाळेच्या २६ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शालेय व्यवस्थापन समिती, सर्व विश्वस्त, मुख्याध्यापक तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सूत्रसंचालन आणि आभार कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन श्रीमती रेखा कोळी मॅडम यांनी श्रीमती वर्षा मॅडम यांच्या सहकार्याने केले. तर कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमती पूनम खेबळे यांनी उपस्थित सर्व पाहुणे, पालक आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध गुणदर्शन कार्यक्रमांनी (गाणी, नृत्य आणि नाटक) या स्नेहसंमेलनात रंगत आणली. पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कौतुकाचा वर्षाव केला.

# नवीन तंत्रज्ञानाने मोठी झेप असून ते घेतली असून ते आत्मसात करण्याचे विद्यार्थ्यांपुढे मोठे आव्हान

## माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** ज्या क्षेत्रात आपल्या पाल्याला आवड आहे त्याच क्षेत्रात त्याला प्रोत्साहन द्या. विनाकारण शैक्षणिक अपेक्षांचे ओझे त्यांच्यावर लागू नका, असे आवाहन अर्जुनराव खोतकर यांनी शहरातील शांतिनिकेतन विद्यामंदिर या शाळेत उपस्थित पालकांना वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना केले. यावेळी शाळेतील गुणवंतांचाही गौरव त्यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर माजी जि.प.अध्यक्ष पंडितराव भुतेकर, माजी जि.प. सदस्य हरिहर शिंदे, प्रवीण मोहता, पांडुरंग काळे, नगरसेवक दिनेश भगत, दुर्गे श काठोटीवाले, कमलेश खरे यांच्यासह आदींची व्यासपीठावर उपस्थित होती. अनेक मुलांना वेगवेगळे छंद व आवडी निवडी असतात. काहींना क्रीडा, विज्ञान तर काहींना अभिनय, कला क्षेत्रात गोडी असते. यापुढे तंत्रज्ञानात होणारे प्रचंड बदल प्रत्येकाने आत्मसात करण्याची गरज असल्याचे माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर म्हणाले. जालना शहरातील शांतिनिकेतन विद्यामंदिर या शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम प्रसंगी बोलताना पुढे म्हणाले की, ही शाळा माझी असल्याची भावना आहे. शाळेच्या स्थापनेपासून मी साक्षीदार आहे. भास्करराव अंबेकर हे सर्व शिक्षक प्रामाणिकपणे विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम करतात. अशा सामान्यांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांची नितांत गरज गरज असल्याचे माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर म्हणाले. डॉक्टर, इंजिनिअर, आयआयटी, उद्योजक अशा क्षेत्रात काम करताना पाहून अत्यंत आनंद होत आहे. बालवाटिका ते दहावी व मागील वर्षापासून नर्सिंग कॉलेज सुद्धा संस्थेने सुरू सांगतात तेव्हा आमची छाती अभिमानाने भरून येते. भविष्यात वेगवेगळे अभ्यासक्रम सुरू करुन गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची परंपरा कायम राहणार असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना




कर्तुत्ववान व्यक्तिमत्व आहे. त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविला. अगदी वीस विद्यार्थ्यांपासून सुरू झालेल्या या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या हजारोंत गेली व शहरात नावलौकिक केला. या शाळेच्या कोणत्याही अडचणीत मी पाठीशी ठामपणे उभा असल्याचे ते म्हणाले. या शिक्षण संस्थेत सामान्य कुटुंबातील, ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षण घेतात तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थेचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, आपण अत्यंत कष्टाने या संस्थेचे बीजरोपण केले, आज त्याचे मोठ्या वृक्षात रूपांतर झाल्याचे पाहून अत्यंत आनंद वाटतो. शाळेच्या या उभारणीत अर्जुनराव खोतकर यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. या शाळेतून सामान्य कुटुंबाततील विद्यार्थ्यांना केले आहे. मी राजकारणात नगरसेवक, नगराध्यक्ष, बाजार समिती संचालक अशा विविध पदावर कार्य केले पण शिक्षण क्षेत्रातील कार्य हे आंतरिक समाधान देणारे आहे. येथे ज्ञान प्राप्त करून विद्यार्थी समाजात मोठ्या आत्मविश्वासाने वावरतात याचा मनस्वी आनंद आहे. शहर व ग्रामीण भागात विद्यार्थी भेटतात व मी आपल्या शांतिनिकेतन चा विद्यार्थी असल्याचे मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी पोवाडे, गवळणी, लावणी, देशभक्ती गीतांसह विविध कला गुण सादर करून शिवगीते सादर करून उपस्थित उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. कार्यक्रमास पालकांची उपस्थिती होती.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.